**नियमित फौजदारी केस क. १२/२०११**
**<u>निशाणी क.८०</u>**

**सरकारतर्फे साक्षीदार कमांक १ याची जबानी.**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की :**

माझे नांव : लक्ष्मी नारायण पार्सेकर धंदा — घरकाम

वय सुमारे : ५० वर्षे.

राहणार — होडावडे, ता.वेंगुर्ला जि.सिंधुदूर्ग

**<u>सरतपास विशेष सहायक अभियोक्ता श्री.गावडे</u>**

०१. मी सन २००२ ते २००७ या कालावधीत होडावडे गावी सरपंच म्हणून काम केलेले होते. त्यावेळेस गणेश मधुसुदन बागायतकर हे ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. ग्रामपचांयतीने होडावडा गावातील भोजदळवीवाडी येथील शाळेच्या दुरुस्तीचे काम शंकर नारायण दळवी यांना दिलेले होते. त्यांना त्यांच्या कामाबाबत ग्रामपंचायतीने चेक दिलेला होता. तो चेक वटला नाही. त्यामुळे ते ग्रामपंचायतीकडे 'खात्यावर पैसे नाही म्हणून चेक वटला नाही', असे सांगत आले. दुसऱ्या दिवशी मी व ग्रामसेवक असे स्वत: बॅकेत जाऊन खात्री केली. चेक वटण्याएवढी पुरेसी रक्कम खात्यात नव्हती. त्यानंतर आम्ही ग्रामपंचायतीचे सदस्य व सर्व कर्मचारी यांची खास सभा घेतली. तसेच ही बाब गटविकास अधिकारी पंचायत समिती यांच्या कानावर घातली. आम्ही आणखी कोणत्या खात्यावरील पैसे काढले आहेत का? याबाबत सभेमध्ये चौकशी केली. इतर खात्यावरील पैसे देखील काढले होते असे आम्हाला आढळले. त्यावेळेस आम्हांला समजले की ग्रामपचांयतीचा शिपाई शेखर नाईक याने हे पैसे काढले होते. त्याने माझी तसेच ग्रामसेवकाची खोटी सही करुन हे पैसे काढले होते. आम्ही त्याच्या नातेवाईकांना सांगितले. त्यांनी हे पैसे भरले. मी याकामी त्याच्या विरुध्द फिर्याद दाखल केली. मला आता सदरची फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.८१** दिली. मी आरोपीस ओळखू शकते.

**<u>उलटतपास वकील श्री. आर.एस.गवाणकर</u>**

०२. माझी किती तारेखच्या सभेत सरपंच म्हणून नियुक्ती झाली हे मला आठवत नाही. मी पुन्हा सांगते की दि.२९/१२/२००६ च्या सभेत माझी सरपंच म्हणून नेमणूक झाली. मी पुर्वीच्या सरपंचांकडून सरपंच पदाचा पदभार घेतला होता परंतु, त्याचे कागद नाहीत. मी सरपंच होण्यापूर्वी होडावडे गावच्या ग्रामपंचायतीशी तत्कालीन कार्यकारीणीशी माझा काही संबंध आलेला नाही. मुंबई ग्रामपचांयत अधिनियम १९५८ चे कलम १७६ अंतर्गत असणाऱ्या एकंदर ४० प्रकारचे नियम मी वाचलेले नाहीत. मी लेखापरीक्षण व खातेवही नियम वाचलेले नाहीत. ग्रामपंचायतीच्या बॅकेतील खात्यांची जबाबदारी सरपंच व ग्रामसेवकाची असते. बॅकेतून पैसे काढावयाचे असल्यास सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त सहीने धनादेशाद्‌वारे रक्कम काढली जाते. ग्रामपचांयतीचे बॅकेत खाते काढावयाचे असल्यास त्यासाठी सूचक अनुमोदकासह ठराव करावा लागतो. या ठरावाचे इतिवृत्त लिहावयाचे असते. हे इतिवृत्त ग्रामपंचायतीच्या पुढील मासिक सभेत वाचून दाखवून मंजूर झाल्यानंतर त्याला कायद्याचे अधिष्ठान प्राप्त होते. बॅकेत ग्रामपचांयतीचे खाते उघडयासाठी अशाप्रकारे ठराव झाल्याबाबत इतिवृत्त लिहून ते ग्रामपचांयतीच्या मासिक सभेत कायम झाल्याबाबतची कागदपत्रे या केसकामी चौकशीच्या वेळेस मी पोलिसांकडे दिलेली होती. अशा ठरावाचा नंबर आता सांगता येणार नाही. मला कॅशबुकाची माहिती आहे. ग्रामसेवकाकडे सदर कॅशबुकाच्या नोंदी असतात. ग्रामसेवकावर सरपंचाचे नियंत्रण असते. ग्रामपचांयतीस स्वत:स पैसे काढावयाचे असल्यास चेक कोणाच्या नावे लिहावयाचा असतो याची मला माहिती नाही. रु. २०,०००/— पेक्षा अधिक रक्कम द्‌यावयाची असल्यास क्रॉस चेक द्‌यावा लागतो. चेक देण्यापूर्वी ज्या कामासाठी चेक द्‌यायचा त्याचे बिल ग्रामपंचायतीच्या मासिक सभेतून मंजूर करुन घ्यावे लागते. ग्रामपंचायतीच्या कामासाठी जाहीर निविदा मागविणे आवश्यक असते. आरोपीने तथाकथीत चेकद्‌वारे ज्या रकमा दिल्या त्या रकमेबाबत ग्रामपंचायतीमार्फत निविदा मागिविण्यात आलेल्या नव्हत्या अगर कार्यारंभ

आदेश देण्यात आलेले नव्हते. ग्रामपंचायतीत बांधकाम समिती होती. या खटल्याकामी नमूद बांधकामा व्यतिरिक्त अन्य बांधकामासाठी चेक काढले होते. हे चेक दिले म्हणून स्थळप्रतवर ज्याला चेक दिले त्याची सही घेतली अगर कसे याची मला माहिती नाही. जो काही तथाकथीत अपहार झाला त्यामध्ये सर्व रक्कम धनादेशाद्वारे काढली होती. एकूण ६ चेक वटविण्यात आलेले होते. ग्रामपंचायतीची एकूण २ बॅकेत खाती आहेत. हे चेक एका बॅकेत २ व दुस—या बॅकेत ४ असे वटविण्यात आलेले होते. एकूण किती रकमेचा अपहार झाला हे मला आता सांगता येणार नाही. चेक बुके ग्रामसेवकाच्या ताब्यात असतात. माझ्या कार्यकालात गणेश बागायतकर हे ग्रमसेवक होते. चेक द्यावयाचा असल्यास व्हौचर द्यावे लागतात. व्हौचर संमत करण्याचा अधिकार सरपंचाचा असतो. व्हौचर संमत झाल्याशिवाय धनादेश वितरीत होत नाही. ग्रामपंचायतीत धनादेशाची नोंदवही असते आम्ही तशी नोंदवही ठेवली होती. किती चेकचे चेकबुक बॅकेने ग्रामपंचायतीला दिले होते हे मला आठवत नाही. किती चेक शिल्लक असताना पुढील चेकबुकसाठी बॅकेला पत्र द्यावे लागते याची मला माहिती नाही. माझ्या म्हणण्यानुसार आरोपीने ग्रामपंचायतीचा विश्वासघात केला, तसेच फसवणुक केली आहे. ग्रामपंचायतीत नोकरी हवी असल्यास अर्ज करावा लागतो. स्थानिक लेवलवर या नेमणुका ग्रामपंचायत करते. पगार ग्रामपंचायतच देते. पगार देताना व्हौचरवर सही घेतली जाते. हा पगार ग्रामनिधीतून खर्ची टाकला जातो. त्यासाठी धनादेश दिला जातो. अशाप्रकारे धनादेश दिल्याबाबत पोलिसांकडे मी पुरावा दिलेला नाही. कॅशबुकावर माझी तसेच ग्रामसेवकाची सही असते. धनादेशांची कॅशबुकामध्ये नोंद केली जाते. चेक वटल्यानंतर क्रेडीट साईडला की डेबीट साईडला नोंद केली जाते याची मला माहिती नाही. जर चेक वटला नाही तर कशाप्रकारे नोंद केली जाते हे मला सांगता येणार नाही. आम्ही साधारण महिन्याने पासबुक अद्यावत करतो. मला कॅशबुक व पासबुकातील तफावतीबाबत बॅक रीकौन्सीलेशन स्टेटमेंट घेतले जाते याची मला माहिती नाही. अशाप्रकारे काही तफावत झाल्यास ती दुरुस्ती करता येते याची मला माहिती नाही. कॅशबुक कसे लिहीतात व कसे वाचतात याची मला माहिती नाही.

०३.	ग्रामपंचायतीच्या पासबुकांची एकूण संख्या ४ आहे. ग्रामनिधी, बारावा वित्त आयोग, इंदिरा आवास योजना, ग्राम पाणीपुरवठा योजना अशी ही खाती आहेत. मला ६ नंबर फॉर्म व १८ नंबर फॉर्म माहिती आहे पण मला आता आठवत नाही. ग्रामपंचातीत कर्मचाऱ्यांची डयुटी लिस्ट ठेवली जाते. आरोपीचा ग्रामपंचायतीशी कोणत्याही प्रकारे संबंध असल्याविषयी कागदपत्रे मी पोलिसांकडे दिली अगर कसे हे आठवत नाही. आरोपीस ग्रमपंचायतीत नोकरीस घेतल्याबाबत ग्रामपंचायतीचा ठराव अगर नेमणूकपत्र मी पोलिसांकडे हजर केलेले नाही. आरोपीने त्याला दिलेले पद स्विकारलेबाबत पत्र अगर त्याला हजर करुन घेतले हे दाखविणारे कागदपत्रे पोलिसांकडे हजर केलेले नाहीत. आरोपीस बॅकेचे काम करण्याकरीता अधिकार पत्र दिल्याबाबत कागदपत्रे पोलिसांकडे हजर केलेली नाहीत. आरोपीकडे चेक बुक दिले व त्यांनी ते घेतले यासाठी ग्रामपंचायमतीकडे पोहच पावती नाही. मी सरपंच पदावर कार्यरत असताना लेखापरीक्षण झाले होते. हे लेखापरीक्षण नियमित स्वरुपाचे होते. लेखापरीक्षण करताना ग्रामपंचायतीच्या खात्यांमध्ये अपहार झाला आहे असे त्यांच्या लक्षात होते अगर कसे याची मला माहिती नाही. ग्रामपंचायतीच्या बॅकमध्ये असणाऱ्या खात्यांमधील खाते उताऱ्याच्या सही शिक्का प्रती बॅकर्स बुक्स ऑफ इव्हीडन्स ॲक्ट च्या तरतुदीनुसार मी पोलिसांना फिर्यादीसोबत दिलेले होते. किती उतारे दिले हे मला आठवत नाही.

न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत,

माइया समोर नोंदविले.

सही/—

मुख्य न्यायदंडाधिकारी,

<u>सिंधुदुर्ग—ओरोस</u>

दिनांक : ०६/०९/२०१८.

**शपथेवर उलटतपास पुढे सुरु...**

०४. ग्रामपंचायतीत नेमले जाणारे कर्मचारी ठराव करुन नेमले जातात. कर्मचा—याचे वेतन सचिव म्हणजेच ग्रामसेवक तयार करतात व त्यानंतर सरपंच त्यावर सही करतात. आरोपीस दिलेले वेतन कॅशबूकमध्ये नोंदविले अगर कसे हे मला आठवत नाही. त्या बाबतचे कागदपत्रे पोलिसांना दिली अगर कसे हे मला आठवत नाही. चेकबुक व कॅशबुक आणि कॅश ग्रामसेवकाकडे असतात. नवीन चेकबूकची मागणी ग्रामसेवक व सरपंच यांच्या सहीने होते. नवीन चेकबुकाविषयी बॅकेकडून ग्रामपंचायतीस पत्र आले होते अगर कसे हे मला सांगता येणार नाही. याबाबत तत्कालिन ग्रमसेवक सांगू शकतील.

०५. तक्रार दाखल करण्यापूर्वी गट विकास अधिकारी वेंगुर्ला आणि विस्तार अधिकारी पंचायत समिती वेंगुर्ला यांची परवानगी आम्ही घेतली होती. तक्रार दाखल करण्यापूर्वी ग्रामपंचायतीमध्ये त्याविषयी ठराव संमत झाला अगर कसे हे मला आठवत नाही. तक्रार दाखल करण्यासाठी लेखी परवानगी मागीतली होती अगर कसे हे मला आठवत नाही. ग्रामपंचायतीतून पाठविल्या जाणा—या पत्राची एक प्रत जावक क्रमांक घालून ग्रामपंचायतीच्या दप्तरी ठेवली जाते. ग्रामपंचायतीत येणा—या पत्रांना आवक क्रमांक घालून ग्रामपंचायतीच्या दप्तरी ठेवले जाते. आलेल्या पत्रांवर सरपंचाचा शेरा असतो. आरोपीबाबत तक्रार दाखल करण्यासाठी अशाप्रकारे गटविकास अधिकारी अगर विस्तार अधिकारी यांचे पत्र आले होते अगर कसे हे मला आठवत नाही. याबाबतची कागदपत्रे ग्रामपंचायतीच्या दप्तरी आहेत अगर कसे हे मला आठवत नाही. आरोपीस निलंबित करावे अगर काढून टाकावे अगर त्याची चौकशी करावी या संदर्भात ठराव झाला होता अगर कसे हे मला आठवत नाही. आरोपीची अंतर्गत चौकशी झाली होती. त्याला कारणे दाखवा नोटीस दिलेली नव्हती. आरोपीची ग्रामपंचायतीमार्फत चौकशी होवून त्याला दोषी ठरविले अगर कसे

हे मला सांगता येणार नाही. आरोपीस लेखी आदेश करुन नोकरीतून काढून टाकले अगर कसे हे मला आठवत नाही. आरोपीस भविष्य निर्वाह निधी, उपादान नोटीस पगार वेतन वगैरे रकमा दिल्या अगर कसे हे मला आठवत नाही. आरोपीस काढून टाकण्यात आले. ज्या तथाकथीत रकमेचा अपहार झाला ती रक्कम ग्रमपंचायतीमध्ये जमा करण्यात आली. ही रक्कम जमा झाली त्यावेळेस आरोपी पोलिस कस्टडीमध्ये होता हे म्हणणे खरे नाही. पोलिस स्टेशनला तक्रार करण्यापूर्वी रक्कम जमा करण्यात आली होती. ज्यांनी रक्कम जमा केली त्यांना पावती दिली अगर कसे हे मला माहिती नाही. आरोपीने तो पैसे भरण्यास तयार असल्याबाबत लेखी अर्ज दिला होता अगर कसे हे मला आठवत नाही. आरोपीने स्वतःहून कोणतेही पैसे भरलेले नाहीत हे म्हणणे खरे नाही. जो काही अपहार झाला मी व ग्रमसेवकांनी संगनमताने केला हे म्हणणे खरे नाही. हा अपहार उघड झाल्याने तो आरोपीच्या माथी मारला हे म्हणणे खरे नाही. भरलेले पैसे मी व ग्रामसेवकाने भरले हे म्हणणे खरे नाही.

०६. दिलेले अनुदान शाळा दुरुस्तीसाठी देण्यात आलेले होते. हे अनुदान १७,५००/— इतके होते. बाराव्या वित्त आयोगानुसार ग्रामपंचायतीकडे किती रक्कम आली हे मला माहिती नाही. ज्या कामासाठी निधी येतो तो त्याच कामासाठी खर्च करणे आवश्यक असते. जो काही निधी येतो तो सरपंच व सचिव म्हणजेच ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यावर ठेवला जातो. हा निधी बॅक ऑफ इंडियाच्या वेंगुर्ला शाखेत ठेवला होता. वित्त आयोगाकडून प्राप्त निधी बॅकेत ठेवण्याकरीता ग्रामपंचायतीचा ठराव झाला अगर कसे हे मला आठवत नाही. अशाप्रकारे निधी बॅकेत ठेवण्याकरीता कस्टडी ॲण्ड इनव्हेस्टमेंट रुल्स् १९६१ आहेत अगर कसे हे मला माहिती नाही. वित्त आयोगाने कोणत्याही कामासाठी ग्रामपंचायतीस निधी दिलेला नव्हता हे म्हणणे खरे नाही. ग्रामपंचायतीस कोणताही निधी वित्त आयोगाकडून प्राप्त होत नाही हे म्हणणे खरे नाही. आरोपी होडावडा ग्रमपंचायतीस कधीही नोकरीस नव्हता हे म्हणणे खरे नाही. त्याच्याकडे चेकचे अगर आर्थिक

व्यवहार नव्हते हे म्हणणे खरे नाही. तो कधीही बॅकेत पैसे भरण्यास अगर काढण्यास जात नव्हता हे म्हणणे खरे नाही. त्याने माझी अगर ग्रामसेवकाची सही करुन कधीही कोणत्याही कारणासाठी बॅकेतून पैसे काढलेले नव्हते हे म्हणणे खरे नाही. सरपंचाचा व ग्रामसेवकाच्या नावाचा शिक्का आहे. वापरण्यात आलेले धनादेश सलग नंबराचे होते अगर अनुक्रमांक सोडून होते हे मला सांगता येणार नाही. आरोपीने वापरलेले तथाकथीत धनादेश माइया नजरेस पडलेले नाहीत. मी धनादेश पाहिले नसल्यामुळे त्यावरील सही माझीच होती हे मी सांगू शकणार नाही हे म्हणणे खरे नाही. माइया सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे हे म्हणणे खरे नाही. पोलिसांनी माइया सहीचे नमुने घेतले होते. किती सह्या घेतल्या हे मला आठवत नाही. हे नमुने पोलिस स्टेशनला घेतले. मी खोटी साक्ष देते हे म्हणणे खरे नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

माइया समोर नोंदविले.

सही/—

मुख्य न्यायदंडाधिकारी,

दिनांक : १०/०९/२०१८.

सिंधुदुर्ग—ओरोस